1/83626/2023

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महसूल व वन विभाग
# विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
दुरध्वनी क्र.०२५३-२४६२४०१ ते ४०५ / फॅक्स क्र.०२५३-२४५२१९४. (ई-मेल- divcomnashik@gmail.com)
**************************************************************

क्रमांक :-भुसू-२/संकीर्ण/ई-चावडी, ई हक्क प्रणाली/२०२३

**प्रति,**
**जिल्हाधिकारी,**
**नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार, अहमदनगर.**

**विषय** :- १ ऑगस्ट २०२३ पासुन ई-चावडी व ई- हक्क प्रणालीची १०० % अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :- १) राज्य समन्वयक, ई फेरफार प्रकल्प जमाबंदी आयुक्त पुणे यांचेकडील पत्र क्र.रा.भू-४/रा.स/मा.सु.क्र.१३२/२०२० दि. ०३/०२/२०२०
२) मा. जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख (म.रा) पुणे यांचेकडील पत्र क्र/रा.भू.अ.आ.का-४/मा.सु.२१३/२०२१ दि. २१/०१/२०२२

उपरोक्त विषयान्वये कळविणेंत येते की, संदर्भ क्र. १ वरील मार्गदर्शक सुचना व यानंतर काढण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना व या कार्यालयाकतुन " ई- हक्क " प्रणाली बाबत देण्यात आलेल्या पत्रांकडे लक्ष वेधण्यात येते.

फेरफार नोंदी घेण्याची प्रक्रीया अधिक सुलभ, अचूक व गतिमान करण्यासाठी शासनाने तलाठी कार्यालयात फेरफार नोंदविण्यासाठी करावयाचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने दाखल करण्यासाठी ई- हक्क प्रणाली (PDE Public Data Entry ) विकसीत करुन उपयोगात आणली आहे.

संदर्भ क्र. २ वरील व त्याअनुषंगाने जमाबंदी आयुक्त व महाराष्ट्र शासनाने पत्रे, परिपत्रके व शासन निर्णयाव्दारे तलाठी कार्यालयाव्दारे होणारी जमीन महसुली रकमांची आकारणी, मागणी निश्चिती व वसुली यांची माहिती सर्वसामान्य नागरीकांना वेब पोर्टलवर सुलभरित्या उपलब्ध करुन देणे व तेथुन रक्कम शासनाच्या तिजोरीत भरणे या उद्देशाने "ई - चावडी प्रणाली " विकसीत केलेली आहे. १ ऑगस्ट २०२३ पासुन "ई - चावडी प्रणाली " प्रणालीचा वापर १०० % तलाठी करतील याबाबतची खात्री आपले स्तरावरुन करण्यात यावी.

उपरोक्त दोन्ही प्रणालीबाबत संबधित कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे व तलाठी दप्तर अद्यावत करुन घेणे या बाबी आपल्या स्तरावरुन पूर्ण झालेल्या असतीलच.

१ ऑगस्ट २०२३ पासुन नाशिक विभागातील सर्व जिल्हयात " ई-हक्क " व " ई- चावडी " या प्रणालींचा वापर १०० % सुरु करण्यात यावा. नागरिकांचे सर्व अर्ज " ई-हक्क " प्रणालीव्दारेच स्विकृत करावेत. नागरीकांना अर्ज भरण्यासाठी पूरेशा सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात व त्यांसंदर्भातील माहिती स्थानिक वृत्तपत्रात, केबल नेटवर्कव्दारे, सोशल मिडीयाव्दारे नागरिकांना होईल त्या दृष्टीकोनातुन प्रसिध्दी द्यावी.

तसेच सर्व शेतक-यांची पीक पाहणी " ई-पीक पाहणी " ॲपव्दारेच होईल याबाबत दक्षता घ्यावी. नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांच्या होणा-या नुकसानीची नोंद " ई- पंचनामा " प्रणालीव्दारे करण्यात येणार असुन या प्रणालीचा संबंध " ई-पीक पाहणी " प्रणालीशी जुळालेला आहे. शेतक-यांना नुकसान भरपाई न मिळाल्यास संबंधित यंत्रणा जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

ई- पिक पाहणीच्या प्रसिध्दीसाठी गतवर्षी पुरविण्यांत आलेल्या प्रचार प्रसिध्दी साहित्याचा वापर करावा तसेच ई- हक्क प्रणालीच्या प्रसिध्दीसाठी नमुना म्हणुन ई-ऑफीस व्दारे आपणांस पोस्टर्स पाठविण्यांत येत आहेत सर्व तलाठी कार्यालय, ग्रामपंचयाती, तहसिल कार्यालये, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात सदरचे पोर्स्टस दर्शनी भागात लावुन व्यापक प्रसिध्दी देण्यांत यावी.

Signed by Radhakrishna
Vitthalrao Game
Date: 24-07-2023 16:22:50
( राधाकृष्ण गमे )
विभागीय आयुक्त,
नाशिक विभाग नाशिक.